# प्रारंभीक अधिसुचना

जा.क्र.2016/उपविअप/भूसंपादन/सिआर-
कार्यालय उपविभागीय अधिकारी परतूर
दिनांक 05/10/2016

भूमीसंपादन, पुनर्वसन व पर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 11 (1) खालील अधिसुचना.

ज्याअर्थी, भूसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 (30 चा 2013 ) कलम 3 च्या खंड ई च्या परंतूका व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण/11/2014/ प्र.क्र.77/अ-2 दिनांक 19 जानेवारी 2015 (यात यापुढे "उक्त अधिसुचना" असा करण्यात आला आहे) यात यापुढे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (झेडअे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी,एखाद्या जिल्हयातील 500 हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्यात क्षेत्रा करीता जमीन संपादन करण्याचा संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी सुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनूसार समुचित शासन असलेल्या जालना जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास या सोबत जोडलेल्या अनुसूचि एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे. सार्वजनिक प्रयोजनासाठी (यातयापुढे जिचा निर्देश " सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे वर्णन यासोबत जोडलेल्या सुसूची दोन मध्ये दिलेलले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोटकलम (1) च्या तरतूदीन्ये याव्दारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमीनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असण्याचा संभव आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, कलम 43 च्या पोटकलम (1) पुनर्वसन व पुनस्थापना या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकांचा तपशिल या सोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता असे घोषीत करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम 4 अनुसार कोणती ही व्यक्ती ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासुन ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधी पर्यत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणता ही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणता ही भार निर्माण करणार नाही. परंतू उक्त जमीनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतूदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतू आनखी असे की, कोणत्या ही व्यक्तीने या तरतूदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्या ही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्या कडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (5) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनस्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम 2014 (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम 10 च्या उपनियम (3) व्दारे विहीत केल्या प्रमाणे भूमीअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनिमयाच्या कलम 3 च्या उपखंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्य पारपाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी परतूर जि.जालना यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-1

## जमीनीचे वर्णन

**गावाचे नाव : देवगाव खवणे तालूका : मंठा जिल्हा : जालना**

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजीत क्षेत्र (हे.आर मध्ये) |
|---|---|---|
| 1. | 250 | 0.21 |
| 2 | 249 | 0.63 |
| 3 | 256 | 0.35 |
| | एकुण | 1.19 |

## अनुसूची-2

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपा बाबत विवरण

प्रकल्पाचे नाव : मौजे देवगाव खवणे ता.मंठा येथील गट क्रमांक 250, 249 व 256 मधील क्षेत्र 1 हे.19आर जमीन पाझर तलाव क्रमांक (8) करीता भूसंपादन.

प्रकल्पकार्याचे वर्णन : देवगाव खवणे पाझर तलाव क्रमांक (8) करीता भूसंपादन

समाजास मिळणारे लाभ : या पाझर तलावा मुळे मौजे देवगाव खवणे ता.मंठा जि.जालना येथील जमीनीतील पाणी पातळी वाढेल व सदर तलावाचे पाण्याचा लाभ सिंचनासाठी होऊन गावातील शेतक-यांचे जिवनमान ऊंचावेल.

## अनुसूची 3

बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे : सदरचा पाझर तलाव व्हावा यासाठी प्रवण भागातील कमी क्षेत्रावर आहे. सदरचा पाझर तलाव हा दूर्गम शेतजमीनीवर असून त्यास शेतक-यांची संम्मती आहे. यामध्ये कोणती ही वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्यामुळे अथवा कोणती ही व्यक्ती विस्थापीत होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

आहे. यामध्ये कोणती ही वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्यामुळे अथवा कोणती ही व्यक्ती विस्थापीत होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

## अनुसूची-4

सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश

नविन भूसंपादन कायदा 2013 कलम 6 अन्वये सामाजिक परिणाम निर्धारणातून सुट देण्यात आली आहे.

## अनुसूची-5

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल**

अ) सदरच्या पाझर तलावामुळे गावातील जमीन ओलीताखाली येईल व गावक-याचे जिवनमान उचावेल आणि सदरच्या पाझर तलावाच्या पाण्यामुळे पाझर तलावाच्या आजूबाजूच्या शेतजमीनीतील विहीची पाण्याची पातळी वाढेल. सदरचा पाझर तलाव हा दुर्गम भागातील शेत जमीनीवर असून सदर पाझर तलावास गावक-यांची व संबंधीत शेतकरी यांची संम्मती आहे. सदर पाझर तलावामुळे कोणती ही व्यक्ती अथवा गावठाणाची जमीन बाधीत होत नाही. त्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही. **सबब प्रशासक नियुक्तीचा प्रश्न उदभवत नाही.**

ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता : निरंक

क) ज्या अधिसुचने व्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्याअधिसुचनेचा तपशिल : निरंक

टिप : उक्त जमीनीचा नकाशा उपविभागीय अधिकारी कार्यालय परतूर जि.जालना यांचे कार्यालयात पाहण्या करीता ठेवण्यात आला आहे.

ठिकाण : परतूर

दिनांक 05/10/2016

कार्यालय उप-विभागीय अधिकारी परतूर

उपविभागीय अधिकारी

परतूर जि.जालना

Sub-Divisional Officer

PARTUR